THE YASH ACADEMY™

# पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा

## पेपर क्रमांक – 2

## SUBJECTWISE QUESTION SET

## 2018

**Address :**

**3rd Floor, Moonlight Building, Opp.**

**Sitabuldi Police Station, Sitabuldi Nagpur**

**Mob. 7447777799 / 8381077258 / 07122956053**

## पोलीस उपनिरीक्षक, गट - ब (अराजपत्रित) मुख्य परीक्षा

### अभ्यासक्रम -SYLLABUS

**पेपर क्रमांक - 1 मराठी, इंग्रजी व सामान्य ज्ञान या विषयामध्ये खालील घटक / उपघटकांचा समावेश असेल.**

**मराठी :-** सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे.

**इंग्रजी :-** Common Vocabulary, Sentence structure, Grammer, use of Idioms and phrases & their meaning and comprehension of passage.

**सामान्य ज्ञान:-**

**1. चालू घडामोडी - जागतिक तसेच भारतातील**

**2. माहिती अधिकार अधिनियम - 2005, व महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015**

**3. संगणक व माहिती तंत्रज्ञान -** आधुनिक समाजातील संगणकाची भूमिका, वेगवेगळ्या क्षेत्रातील जीवनात संगणकाचा वापर, डाटा कम्युनिकेशन, नेटवर्कींग आणि वेब टेक्नॉलॉजी, सायबर गुन्हे व त्यावरील प्रतिबंध, नवीन उद्योग म्हणून माहिती तंत्रज्ञानाचा निरनिराळ्या सेवा सुविधांची माहिती मिळण्यासाठी होणारा उपयोग, भारतातील माहिती तंत्रज्ञान उद्योगाची वाढ व त्याचा दर्जा, शासनाचे कार्यक्रम, जसे मिडीया लॅब एशिया, विद्या वाहिनी, ज्ञान वाहिनी, सामुहिक माहिती केंद्र इत्यादी. माहिती तंत्रज्ञान उद्योगातील मुलभूत प्रश्न, त्यांचे भवितव्य.

THE TM
YASH ACADEMY

**पेपर क्रमांक - 2**

**सामान्य क्षमता चाचणी व पदाच्या कर्तव्यासाठी आवश्यक ज्ञान : या विषयामध्ये खालील घटक / उपघटकांचा समावेश असेल.**

1 **बुद्धीमत्ता चाचणी**

2 **महाराष्ट्राचा भूगोल -** महाराष्ट्राचा रचनात्मक (Physical) भूगोल, मुख्य रचनात्मक (Physiographic) विभाग, हवामान (Climate), पर्जन्यातील विभागवार बदल, नद्या, पर्वत, डोंगर, राजकीय विभाग, प्रशासकीय विभाग, नैसर्गिक संपत्ती - वने व खनिजे, मानवी व सामजिक भूगोल - लोकसंख्या (Population), Migration of Population व त्याचे Source आणि Destination वरील परिणाम, ग्रामीण वस्त्या व तांडे, झोपडपट्या व त्यांचे प्रश्न, संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान.

3 **महाराष्ट्राचा इतिहास -** सामाजिक व आर्थिक जागृती (1885 - 1947), महत्वाच्या व्यक्तींचे काम, स्वातंत्र्यपूर्व भारतातील सामाजिक जागृतीतील वर्तमानपत्रे व शिक्षणाचा परिणाम/भाग, स्वातंत्र्यपूर्व काळातील इतर समकालीन चळवळी, राष्ट्रीय चळवळी.

4 **भारतीय राज्यघटना -** घटना कशी तयार झाली आणि घटनेच्या प्रस्तावनेमागची भूमिका व तत्वे, घटनेची महत्वाची कलमे / ठळक वैशिष्ट्ये, केंद्र व राज्य संबंध, निधर्मी राज्य, मूलभूत हक्क व कर्तव्ये, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे -शिक्षण, युनिफॉर्म सिव्हील कोड, स्वतंत्र न्यायपालिका.

5 **मानवी हक्क व जबाबदाऱ्या** – संकल्पना - आंतरराष्ट्रीय मानवी हक्क मानक, त्यासंदर्भातील भारतीय राज्यघटनेतील तरतूद, भारतातील मानवी हक्क व जबाबदाऱ्या यंत्रणेची अंमलबजावणी व संरक्षण, भारतातील मानवी हक्क चळवळ, मानवी हक्कापासून वंचित राहण्याच्या समस्या, गरीबी, निरक्षरता, बेकारी, सामाजिक - सांस्कृतिक - धार्मिक प्रथा यासारख्या अडचणी, (हिंसाचार, भ्रष्टाचार, दहशतवाद, कामगारांचे शोषण, संरक्षित गुन्हेगारी, इत्यादी.) लोकशाही व्यवस्थेतील एकमेकांचे हक्क आणि मानवी प्रतिष्ठा व एकतेचा आदर करण्यासंबंधी प्रशिक्षणाची गरज व महत्व, नागरी हक्क संरक्षण अधिनियम 1955, मानवी हक्क संरक्षण अधिनियम 1993, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम 2005, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम1989, हुंडाबंदी अधिनियम 1961, महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान.

6 **मुंबई पोलीस अधिनियम, 1951** (Maharashtra Police Act)

7 **भारतीय दंड संहिता, 1860** (Indian Penal Code)

8 **फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973** (Criminal Procedure Code)

9 **भारतीय पुरावा अधिनियम, 1872** (Indian Evidence Act.)

**पोलीस उपनिरीक्षक मुख्य परीक्षा (पेपर – 2)**

**PAPER ANALYSIS - SUBJECTWISE**

| विषय | वर्ष (2018) |
|---|---|
| चालू घडामोडी व इतर घटक [CURRENT AFFAIRS] | --- |
| बुद्धीमत्ता चाचणी [REASONING] | 15 |
| भूगोल [GEOGRAPHY] | 10 |
| इतिहास [HISTORY] | 10 |
| भारतीय राज्यघटना [INDIAN POLITY] | 10 |
| माहिती अधिकार अधिनियम - 2005 [RTI ACT -2005] | --- |
| संगणक व माहिती तंत्रज्ञान [COMPUTER & IT] | --- |
| मानवी हक्क व जबाबदाऱ्या [HUMAN RIGHTS & RESPONBILITIES] | 15 |
| मुंबई पोलीस कायदा [MUMBAI POLICE ACT] | 10 |
| भारतीय दंड संहिता [INDIAN PENAL CODE] | 12 |
| फौजदारी प्रक्रिया संहिता - 1973 [CRIMINAL PROCEDURE CODE-1973] | 09 |
| भारतीय पुरावा कायदा [INDIAN EVIDENCE ACT] | 09 |
| | **100** |

* 2017 च्या बदलेल्या अभ्यासक्रमानुसार, चालू घडामोडी, माहिती अधिकार अधिनियम - 2005 व संगणक व माहिती तंत्रज्ञान हे घटक पेपर क्रमांक 1 मध्ये समाविष्ट केले आहे.

# पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा - २०१८

| परीक्षा दिनांक : 02/09/2018<br>वेळ : 2 तास | सामान्य अध्ययन - पेपर २ | एकूण प्रश्न : 100<br>एकूण गुण : 100 |
|---|---|---|

## बुद्धीमत्ता चाचणी

1. माणसे कदाचित निरपेक्ष निश्चिततेसाठी आसुसलेली असतील, कदाचित निश्चितता असावी त्यांची तीव्र इच्छा असेल किंवा काही गटांच्या कट्टर समर्थकांप्रमाणे ती कदाचित निश्चितता प्राप्त झाल्याचा आवही आणत असतील. परंतु विज्ञानाचा आतापर्यंतचा इतिहास-मानवाला सुलभतेने प्राप्त असलेल्या ज्ञानाबाबतचा सर्वात जास्त यशाचा दावा आपण जास्तीत जास्त आपल्या आकलनात एकामागून एक अशी सुधारणा करण्याची (वास्तवाजवळ जाण्याची) आशा बाळगतो, आपल्या चुकांपासून शिकायचे, विश्वाबाबत त्याला स्पर्श न करणारा दृष्टिकोन बाळगायचा, परंतु (सर्वच बाबतीत) निरपेक्ष निश्चितता आपल्याला नेहमीच हुलकावणी देते ही अट (विसरायची नाही)आहे एवढे (निश्चितच) शिकवतो.
पुढीलपैकी वरील युक्तिवादाचा प्रमुख निष्कर्ष अभिव्यक्त करणारे सर्वात योग्य विधान निवडा.
1) विज्ञान आपल्याला हे जग जसे असावे अशी आपली इच्छा आहे यापेक्षा ते कसे आहे याच्या आकलनाकडे घेऊन जाते.
2) कोणत्याही पायरीला आपण वैज्ञानिक आकलनाचा स्वीकार करू नये कारण नेहमीच त्यात आधुनिक सुधारणेला वाव असतो.
3) निश्चितीच्या अभावामुळे विज्ञान आपल्याला आपले भविष्य आपल्या हाती घ्यायला साहाय्य देत नाही यामुळे खात्रीसाठी आपल्याला देवमाणसांवर अवलंबून राहण्याची गरज आहे.
4) जर वैज्ञानिक तथ्ये वैज्ञानिकाकडून मिळत असतील तर आपण कोणतीही चिकित्सा न करता त्यांचा स्वीकार केला पाहिजे.

---

2. सौरडाग ही नियमित कालावधीनंतर सूर्याच्या पृष्ठावर तयार होणारी थंड व गडद क्षेत्र आहेत. वाढलेल्या सौरडाग घटना व पृथ्वीवरील वादळी कालखंड एकाच वेळी येतात असे वैज्ञानिकांचे निरीक्षण आहे. पृथ्वीला जोरदार आणि व्यापक क्षेत्रात होणारा वादळी हवामानाच्या कालखंडांचा हा त्रास सौरडांगाच्या वाढलेल्या संख्येमुळे होतो.
वरील युक्तिवादातील कमकुवतपणा दाखवणारे पुढीलपैकी सर्वात योग्य विधान निवडा.
1) हा युक्तिवाद कमी सौरडागांचा पृथ्वीच्या हवामान प्रणालीवर होणारा परिणाम दुर्लक्षित करतो.
2) हा युक्तिवाद पृथ्वीच्या वातावरणातील कमी दाब प्रणालीमुळे वादळे निर्माण होतात या वस्तुस्थितीवर आक्षेप घेतो.
3) हा युक्तिवाद पृथ्वीवर नेहमीच कोठे ना कोठे वादळ होत असते या वस्तुस्थितीकडे लक्ष देत नाही.
4) या दोन घटना एकाच वेळी घडत असल्याने एक दुसरीला कारणीभूत आहे असे गृहीत धरले आहे.

---

3. जर X - अक्ष वेळ निर्देशित करत असेल आणि Y - अक्ष वेग निर्देशित करत असेल तर पुढील माहिती निर्देशित करणारा उचित आलेख निवडा.
आकाशात सूर मारणारी व्यक्ती विमानातून बाहेर पडताच अंतिम गती म्हणून ओळखला जाणारा कमाल वेग गाठेपर्यंत अधिकाधिक वेगाने खाली येऊ लागते. हवाई छत्री उघडेपर्यंत ती याच वेगाने खाली येत राहते. हवाई छत्री, व्यक्तिचा हा वेग खूपच कमी होई पर्यंत मंद करते. व्यक्ती जमिनीला स्पर्श करेपर्यंत हा वेग स्थिर रहातो. उत्तर - 4

(1)  (2)  (3)  (4) 

---

4. अक्षर माला दिलेली आहे. त्यातील नियम ओळखून दिलेल्या पर्यायातील योग्य पर्याय शोधा.
Y, W, T, P, K, ?
1) F 2) E 3) G 4) D

---

5. S,T, U, V, W, X आणि Y हे एकमेकांना समांतर रस्ते आहेत. रस्ता S हा, रस्ता T च्या दक्षिणेकडे 1/2 km वर आहे. रस्ता U हा, रस्ता

V च्या उत्तरेकडे 1 km वर आहे. रस्ता W हा, रस्ता X च्या उत्तरेकडे 1/2 km वर आहे. रस्ता W हा, रस्ता Y च्या दक्षिणेकडे 1 km वर आहे. W हा V च्या दक्षिणेकडे 1/2 km वर आणि T च्या उत्तरेकडे 1 km वर आहे. रस्त्यांच्या ज्या जोडीतील अंतर 3/2 km नाही, अशी जोडी निवडा.

1) U, W 2) V, T 3) U, X 4) X, Y

---

6. एका संयुक्त कुटुंबातील सर्वांपैकी 8 सदस्य चिकू खात नाहीत, 9 सदस्य पपई खात नाहीत, 8 सदस्य पेरू खात नाहीत, 6 जण पपई व पेरू खात नाहीत, 4 जण चिकू व पेरू खात नाहीत, 4 जण पपई व चिकू खात नाहीत, 3 जण येथे उल्लेखिलेली 3 फळे खात नाहीत. या सर्व कुटुंब सदस्यांची एकूण सख्या दर्शवणारा पर्याय निवडा.

1) 25 2) 14 3) 17
4) हे सदस्य कोणती, फळे खातात ही माहिती नसल्यामुळे अपेक्षित संख्या शोधणे शक्य नाही

---

7. एका ठिकाणचे रिक्षा भाडे मीटर दाखवत असलेल्या संख्येवर पुढे वर्णन केल्यानुसार निर्धारित आहे. मीटर दाखवत असलेल्या संख्येनंतरची चार हा गुणक असलेली मोठी संख्या विचारात घेऊन किंमत ठोकळ केली जाते. नमुन्यादाखल जर मीटर वाचन 37 पैसे असेल तर ती संख्या 40 पैसे म्हणून विचारात घेतली जाते. याच्या परिणामी मिळणाऱ्या संख्येला 17 ने गुणले जाते. या संख्येला सर्वात जवळची असणारी 25 च्या पटीत असणारी संख्या विचारात घेऊन अंतिम ठोकळ भाडे गणले जाते. जर मीटर वाचन 55 असेल तर रूपयांत अंतिम भाडे निवडा.

1) 9.75 2) 9.50 3) 8.00 4) 8.75

---

8. 1981 च्या ऑक्टोबर 1 तारखेला गुरूवार होता. तेव्हापासून पाचव्या रविवारच्या चार दिवस आधी कोणती तारीख होती ?

1) ऑक्टोबर 28 2) ऑक्टोबर 29 3) ऑक्टोबर 27 4) नोव्हेंबर 1

---

9. चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी जमाल त्याच्या आठ घोडयांना रथाला दोघा-दोघांच्या चार ओळीत जुंपणार आहे. त्याने त्यांची व्यक्तिगत नावे ठेवली असती तरी वर्णाक्षरानींही निर्देशित केले आहे. तो त्याच्या घोडयांना चांगले ओळखतो आणि त्यांच्या सवयी विचारात घेऊन त्याला पुढील नियम लक्षात ठेवावे लागतात. A ला नेहमीच उजव्या बाजूला जूंपावे लागते पण सर्वात पुढच्या ओळीत जुंपून चालत नाही. B व C यांना मधल्या दोनपैकी एका ओळीत जुंपावे लागते पण त्यांना एकाच ओळीत जुंपण्याची गरज नाही. E ला नेहमीच नेमके D च्या पाठी जुंपावे लागते. G ला नेहमीच F च्या पुढे जुंपावे लागते पण दोघे एकाच बाजूला कधीही नकोत आणि B किंवा C च्या शेजारी नकोत. H ला नेहमीच A पासून शक्य तेवढया दूर जुंपावे लागते पण ते एका ओळीत जुंपून चालत नाही. दिलेल्या यादीतून समोरच्या ओळीला लगेच लागून असलेल्या ओळीतील उजवीकडून- डावीकडे अशी/शा सर्वात शक्य जोडी/डया निवडा. #

अ. E-D ब. G-D क. A-E ड. A-C इ. E-A

पर्याय :

1) फक्त अ व ड 2) इ खेरीज सर्व 3) फक्त अ, क, इ 4) फक्त अ, क, ड

---

10. दिशा सायकलवरून तिच्या घराच्या 2 किमी दक्षिणेला तिची मैत्रिण मेलनीला भेटायला तिच्या घरी गेली. तेथून त्या दोघी पश्चिमेला 5 किमी वर महारूखला भेटायला तिच्या घरी स्वतंत्र सायकलींवरून गेल्या. तेथून त्या तिघी मैत्रिणी स्वतंत्र सायकलींवरून 2 किमी उत्तरेला, 11 किमी पूर्वेला, 2 किमी दक्षिणेला आणि शेवटी 5 किमी पश्चिमेला गेल्या. या ठिकाणापासून त्यांनी एकाच वेळी, समान गतीने, सर्वात कमी लांबीच्या मार्गाने स्वतःच्या घरी परतायला सुरूवात केली तर कोणती व्यक्ती सर्वात शेवटी घरी पोहोचेल ?

1) दिशा 2) मेलनी 3) महारूख 4) माहिती पुरेशी नाही

---

11. पुढील युक्तिवाद अभ्यासा आणि त्यातील वापरलेल्या तर्काशी सारखेपणात सर्वात जवळचा असलेला पर्याय निवडा.

सर्व फळे झाडांवर वाढतात. तो वृक्ष फळे धारण करतो. म्हणून तो वृक्ष झाड आहे.

1) सर्व झाडे फळे धारण करतात. तो वृक्ष फळे धारण करतो. म्हणून तो वृक्ष झाड आहे.
2) सर्व झाडे फळे धारण करतात. बहावा हे झाड आहे. म्हणून बहावा फळे धारण करतो.
3) सर्व बहावा फळे धारण करतात. ते झाड फळे धारण करते. म्हणून ते झाड बहावा आहे.
4) सर्व वृक्ष फळे धारण करतात. ती शेंग बहावा फळ आहे. म्हणून सर्व वृक्ष बहावा आहेत.

---

12. एका संकेत प्रणालीनुसार, 'bright fresh sunny day' चा संकेत ' mec rig koh muf' हा आहे. 'fragrance of fresh flowers' चा संकेत

‘ ‘rig pok og hez’ हा आहे. ‘ bright colours of baskets’ चा संकेत ‘ net muf nuk pok’ हा आहे आणि ‘ basket filled with flowers’ चा संकेत ‘ pit net og jec’ हा आहे. या माहितीचा उपयोग करून पूर्णपणे विसंकेतित न करता येणारा शब्द गट निवडा.

1 ) fragrance of fresh flowers 2 ) colours of bright flowers

3 ) basket of fresh flower 4 ) bright flowers filled baskets

---

13. दिलेल्या माहितीच्या आधारे जास्तीत जास्त तर्कसंगत उत्तर निवडा.

मेलिंदा आणि तिचा भाऊ मिळून त्यांच्या रहात्या घरात काही व्यक्तींबरोबर रहातात. त्यात एक विवाहित जोडपे, जुळ्या बहिणींची जोडी आणि चुलत भावांची जोडी त्यांच्या बरोबर रहातात. बहिणींपैकी एक चांगल्या प्रकारे बाईकस्वार नाही तरीही सर्व स्त्रिया दिवसभराच्या बाईकस्वारीला गेल्या. एक पुरूष डॉक्टर असल्याने तो 24 तास देखभालीची आवश्यकता असलेल्या रूग्णाची काळजी घेण्यासाठी सकाळी गेला. इतर सर्व पुरूष दिवसभराच्या निसर्ग फेरीला गेले.

दुपारी 12 वाजता घरी कोण आहे ?

1 ) फक्त डॉक्टर असलेला पुरूष घरी असेल कारण तो त्याचे काम संपवून घरी परतला.

2 ) एक जुळी बहीण जी बाईकस्वारीत चांगली नाही.

3 ) स्त्रियांपैकी कोणीही नसेल.

4 ) तिघे पुरूष जे निसर्ग फेरीला गेले आणि लवकर घरी परतले.

---

14. ओळींतील शेवटच्या आणि स्तंभांतील तळाच्या प्रत्येक तिसऱ्या फरशीची नक्षी पहिल्या दोन फरशांवरील, एकमेकांवर येणारे समान घटक वगळता उरलेले घटक एकत्र करून तयार केली आहे. दिलेल्या रचनेसंदर्भात तर्कविसंगत फरशीचे स्थान आणि दिलेल्या पर्यायांतून तिच्याऐवजी ठेवण्यासाठी उचित फरशी निवडा.




ACADEMY TM

पर्याय :

1 ) A - 1; d 2 ) A - 2; c 3 ) B - 1; b 4 ) B - 2; a

---

15. एका डीलरने रू 36 देऊन एक ग्रॅास अंडी विकत घेतली. त्याने ती अंडी विक्री किंमतीने नफ्यामध्ये 12.5 टक्के ने विकली. एका अंड्याची सर्वात जवळपासची विक्री किंमत काय आहे ?

1 ) 33 पैसे 2 ) 30 पैसे 3 ) 29 पैसे 4 ) 28 पैसे

---

## भुगोल

16. 2011 च्या जनगणनेनुसार नंदूरबार जिल्हयात --------- % लोकसंख्या साक्षर आहे.
1) 61.6 2) 64.4 3) 63.4 4) 66.4

17. जोडया लावा :

| जिल्हा | जलसिंचन योजना |
|---|---|
| अ. यवतमाळ | 1. जयगाव |
| ब. नागपूर | 2. तुलतुली |
| क. गडचिरोली | 3. वेण्णा |
| ड. बुलढाणा | 4. बेंबला |

पर्यायी उत्तरे :

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 1 | 2 | 3 | 4 |
| 2) | 2 | 4 | 1 | 3 |
| 3) | 4 | 3 | 2 | 1 |
| 4) | 3 | 1 | 2 | 4 |

18. महाराष्ट्रात दगडी कोळशांचे सर्वात मोठे साठे कोठे आढळतात ?
1) कोल्हापूर 2) सोलापूर 3) नवापूर 4) बल्लारपूर

19. ------- ही मुळा नदीची उपनदी आहे.
1) पवना 2) वेल 3) कुडाळी 4) अंबी

20. खालीलपैकी कोणती मृदा लोहाचे ऑक्साईड व अल्युमिनिअम समृध्द असते ?
1) काळी मृदा 2) लॅटराईट मृदा 3) दलदलीची मृदा 4) वाळवंटी मृदा

21. 2001-2011 या दशकामध्ये महाराष्ट्राच्या लोकसंख्येत किती टक्के वाढ झाली ?
1) 11.99 2) 10.99 3) 14.99 4) 15.99

22. 2011 च्या जनगणनेप्रमाणे महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींचे किती टक्के प्रमाण आहे ? #
1) 10.2 आणि 8.8 2) 10.11 आणि 8.8 3) 9.2 आणि 8.2 4) 8.8 आणि 10.2

23. जोडया लावा : लोहखनिज उत्पादन

| जिल्हा | ठिकाण |
|---|---|
| अ. चंद्रपूर | 1. सुरजागड |
| ब. नागपूर | 2. खुर्सिपार |
| क. गोंदिया | 3. भिवापूर |
| ड. गडचिरोली | 4. असोळा |

पर्यायी उत्तरे :

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 4 | 3 | 2 | 1 |
| 2) | 1 | 2 | 3 | 4 |
| 3) | 4 | 2 | 1 | 3 |
| 4) | 3 | 1 | 2 | 4 |

24. खालीलपैकी कोणते/ती विधान/ने बरोबर आहेत ?

अ. ठाणे जिल्हयात खारफुटीची वने आढळतात.
ब. रोशा गवतापासून तेल बनवले जाते.
क. तिवर हा गडचिरोली जंगलातील महत्वाचा वृक्ष आहे.
पर्याय :
1) अ 2)अ, ब 3) ब, क 4) अ, ब, क

25. जनगणना 2011 प्रमाणे कोणत्या जिल्ह्याची लोकसंख्या कमी आहे ?
1) जालना 2) परभणी 3) अमरावती 4) लातूर

## इतिहास

26. 1927 मध्ये मुंबईत झालेल्या शेतकरी कामगार पक्षाच्या स्थापनेत पुढीलपैकी कोणत्या नेत्याचा सहभाग नव्हता ? #
1) एस. एस. मिरजकर 2) के. एन. जोगळेकर 3) एस.व्ही. घाटे 4) एम.आर. जयकर

27. बुलढाणा जिल्ह्यात मेहकर व चिखली तालुक्यात 1930 साली कर्जबाजारी शेतकऱ्यांनी ------- च्या नेतृत्वाखाली सत्यशोधक चळवळीच्या धर्तीवर प्रतिकार सुरू केला.
1) पंढरीनाथ पाटील 2) केशवराव जेधे 3) केशवराव बागडे 4) आनंदस्वामी

28. जोडया जुळवा
अ. आर.एस.रूईकर — 1. हिंदूस्थान रेड आर्मी
ब. मगनलाल बागडी — 2. प्राचार्य, सेकसारीआ कॉमर्स कॉलेज
क. डॉ. खेडेकर — 3. फॉरवर्ड ब्लॉक
ड. श्रीमन नारायण अग्रवाल — 4. अकोल्याचे स्वातंत्र्य सैनिक
पर्याय :

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 3 | 1 | 4 | 2 |
| 2) | 4 | 3 | 2 | 1 |
| 3) | 2 | 4 | 1 | 3 |
| 4) | 1 | 2 | 3 | 4 |

THE YASH ACADEMY TM

29. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व्हावे यासाठीचे पहिले विधेयक 1911 मध्ये इंपीरिअल काउन्सिल मध्ये -------- यांनी मांडले.
1) फिरोझशाह मेहता 2) के.टी. तेलंग 3) गोपाळ कृष्ण गोखले 4) बद्रुद्दिन तय्यबजी

30. भिल्ल, कोळी आणि धनगर यांच्या शिवाय ------- वासुदेव बळवंत फडक्याना येऊन मिळाले.
अ. सीताराम गद्रे ब. रामचंद्रपंत कुलकर्णी क. गोपाळ मोरेश्वर साठे ड. उमाजी नाईक
पर्याय :
1) अ आणि क फक्त 2) ब आणि ड फक्त 3) ब आणि क फक्त 4) अ, ब, क आणि ड

31. 'डेक्कन सभेची' स्थापना कोणी केली ?
1) लोकमान्य टिळक 2) न्यायमूर्ति रानडे 3) गो.ग आगरकर 4) गो.कृ. गोखले

32. फैझपूर काँग्रेस अधिवेशनास स्वयंसेविका म्हणून जाणाऱ्या स्त्रियांसाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन कोणी केले होते ?
1) उषा डांगे 2) प्रेमा कंटक 3) रोझा देशपांडे 4) उषा मेहता

33. 27 जुलै 1879 रोजी टिळकांना अटक करण्यात आली. पुढीलपैकी कोणते आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आले होते ? #

अ. त्यांनी 15 जूनच्या केसरी मध्ये, शिवाजी उत्सवाच्यावेळी 'शिवाजीचे बोल' ही कविता एका तरूणाने वाचली होती, ती प्रसिध्द केली होती.
ब. शिवाजी उत्सवात टिळकांनी केलेल्या भाषणात, शिवाजीने अफझलखानाचा वध केला त्याबद्दल शिवाजीची बाजू उचलून धरली.
क. त्यांनी गणपती व शिवाजी उत्सव सुरू केले.
ड. त्यांनी इंग्रजीतून 'मराठा'हे वृत्तपत्र सुरू केले.
पर्याय :
1) अ आणि क 2) अ आणि ब 3) अ, ब आणि ड 4) अ, ब, क आणि ड

34. अखिल भारतीय किसान सभेच्या दुसऱ्या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी -------- होते.
1) एन. जी. रंगा 2) शंकर देव 3) नरेंद्र देव 4) श्री.अ. डांगे

35. जोडया जुळवा :

| | |
|---|---|
| अ. महर्षी धोंडो केशव कर्वे | 1. श्री. शिवाजी शिक्षण संस्था |
| ब. कर्मवीर भाऊराव पाटील | 2. निष्काम कर्ममठ |
| क. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे | 3. सिल्व्हर ज्युबली रूरल ट्रेनींग कॉलेज |
| ड. डॉ. पंजाबराव देशमुख | 4. अध्यक्ष, डेक्कन एज्युकेशन सोसायटी |

पर्याय :

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 2 | 3 | 1 | 4 |
| 2) | 4 | 3 | 2 | 1 |
| 3) | 3 | 1 | 2 | 4 |
| 4) | 2 | 3 | 4 | 1 |

## भारतीय राज्यघटना

36. राज्य मंत्रिमंडळ पध्दतीचे कोणते प्रमुख वैशिष्टय नाही ?
1) मुख्यमंत्र्याचे नेतृत्व 2) गुप्तता 3) सामूहिक जबाबदारी 4) विधानसभेचे नेतृत्व

THE YASH ACADEMY TM

37. जोडया लावा - राज्य नीतिची मार्गदर्शक तत्वे

| | |
|---|---|
| अ. लवादाद्वारे आंतरराष्ट्रीय विवादांची सोडवणूक | 1. अनुच्छेद 47 |
| ब. समान नागरी संहिता | 2. अनुच्छेद 40 |
| क. ग्राम पंचायतीची स्थापना | 3. अनुच्छेद 49 |
| ड. राष्ट्रीय स्मारकांचे संरक्षण | 4. अनुच्छेद 44 |
| | 5. अनुच्छेद 51 |

पर्याय :

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 1 | 4 | 2 | 5 |
| 2) | 5 | 4 | 2 | 3 |
| 3) | 5 | 2 | 1 | 3 |
| 4) | 1 | 3 | 4 | 5 |

38. अयोग्य विधान ओळखा.
अ. विधान परिषदेतील सदस्यांची एकूण संख्या त्या राज्यातील विधानसभेच्या सदस्यांच्या एकूण संख्येच्या एक तृतीयांशहून अधिक असणार नाही.
ब. जम्मू आणि काश्मिरच्या विधान सभेत 108 सदस्य आहेत.
क. जम्मू आणि काश्मिरच्या विधान परिषदेत 36 सदस्य आहेत.
पर्याय :
1) अ 2) ब 3) क 4) यापैकी एकही नाही

39. राज्यघटना तयार करण्याव्यतिरिक्त घटना समितीने पार पाडलेल्या अन्य कार्याबाबत खालील विधाने विचारात घ्या.
अ. मे 1949 मध्ये भारताच्या राष्ट्रकुलाच्या सदस्यत्वास मान्यता दिली.
ब. 22 जुलै 1947 रोजी राष्ट्रध्वज स्वीकारला.
क. 24 जानेवारी 1950 रोजी राष्ट्रगीताचा स्वीकार केला.
ड. 26 जानेवारी 1950 रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून निवड केली.
पर्याय :
1) विधाने ब, क बरोबर 2) विधाने अ, ब, ड बरोबर 3) विधाने ब, क, ड बरोबर 4) विधाने अ, ब, क बरोबर

40. भारताच्या सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशपदी नियुक्ती होण्यासाठी खालीलपैकी कोणता पात्रतेचा आवश्यक निकष नाही ?
1) तो उच्च न्यायालयाचा पाच वर्षे न्यायाधीश असावा.
2) तो उच्च न्यायालयात दहा वर्षे वकिली करीत असावा.
3) त्याने वयाची 35 वर्षे पूर्ण केली असली पाहिजे.
4) राष्ट्रपतीच्या मते तो नावाजलेला कायदेतज्ञ असावा.

41. खालील विधाने विचारात घ्या.
अ. महाराष्ट्राच्या विधान सभेची सदस्य संख्या 288 आहे.
ब. सयाजी सिलम् हे महाराष्ट्राच्या पहिल्या विधानसभेचे (1960) सभापती होते.
वरीलपैकी कोणते/ती विधान/ने बरोबर आहेत ?
1) फक्त अ 2) फक्त ब 3) अ आणि ब 4) यापैकी नाही

42. मूलभूत हक्कांच्या संदर्भात बरोबर असलेली विधाने :
अ. ते न्यायालयामार्फत प्रत्यक्षात आणता येतात.
ब. ते निरंकुश/अनिर्बंध आहेत.
क. काही हक्क वगळता, राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात ते स्थगित करता येतात.
ड. ते केवळ भारतीय नागरिकांसाठी आहेत.
पर्याय :
1) अ, क, ड 2) अ, ब, क 3) अ, क 4) अ, ड

43. धर्मनिरपेक्षतेबाबत खालीलपैकी कोणते विधान बरोबर नाही ?
1) धर्मनिरपेक्षता हा राज्यघटनेच्या मूलभूत संरचनेचा भाग नाही.
2) भारत हे धर्मनिरपेक्ष राज्य आहे म्हणजेच असे राज्य जे सर्व धर्मांच्या प्रति तटस्थपणा आणि निष्पक्षतेचा भाव ठेवते.
3) भारतामध्ये धर्मनिरपेक्षतेचा अर्थ असा नाही की राज्याचा धर्मांच्या प्रति शत्रुभाव आहे, त्याचा अर्थ असा आहे की राज्याला विविध धर्मामध्ये
राहून सुध्दा तटस्थ रहायला हवे.
4) धर्मांच्या आधारावर मतदारांना आवाहन करणे धर्मनिरपेक्ष लोकशाहीच्या विरूध्द आहे.

44. जोडया लावा - समानतेचा अधिकार

| | |
|---|---|
| अ. अस्पृश्यतेची समाप्ती | 1. अनुच्छेद 15 |
| ब. कायद्यासमोर समानता | 2. अनुच्छेद 17 |
| क. संधीची समानता | 3. अनुच्छेद 14 |
| ड. भेदभावास प्रतिबंध | 4. अनुच्छेद 16 |

पर्याय :

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 1 | 2 | 3 | 4 |
| 2) | 3 | 4 | 1 | 2 |
| 3) | 2 | 3 | 1 | 4 |
| 4) | 2 | 3 | 4 | 1 |

45. भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेनुसार भारत हे गणराज्य आहे. गणराज्याचा अर्थ कोणता ?
अ. देशात अनुवांशिक राज्यकर्ता नाही.
ब. देशाचा प्रमुख हा विशिष्ट कालावधीसाठी जनतेकडून प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या निवडलेला असतो.
पर्याय :
1) विधान अ बरोबर 2) विधान ब बरोबर 3) दोन्हीही विधाने चुकीची 4) दोन्ही विधाने बरोबर

## मानवी हक्क व जबाबदाऱ्या

46. स्त्रियांना घरगुती हिंसाचारापासून संरक्षण कायदा , 2005 मधील ------- अन्वये संरक्षण अधिकाऱ्याने विविध कर्तव्ये पार पाडली पाहिजे.
1) कलम 8 2)कलम 9 (1) 3) कलम 10(1) 4) कलम 10(2)

47. राष्ट्रीय मानवी अधिकार आयोगाच्या अध्यक्षांची नेमणूक राष्ट्रपती ज्या समीतीच्या शिफारसीवरून करतात त्यात -------- यांचा अध्यक्ष म्हणून समावेश असतो.
1) गृह मंत्री 2) विरोधी पक्ष नेते 3) लोकसभेचे अध्यक्ष 4) पंतप्रधान

48. मानवी हक्क संरक्षण अधिनियम, 1993 नुसार मानव अधिकाराच्या उल्लंघनातुन निर्माण झालेल्या खटल्याच्या गतिशील प्रक्रियेसाठी राज्य शासन उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशाच्या सल्ल्याने प्रत्येक जिल्हयासाठी ------- हे मानव अधिकार न्यायालय म्हणून नेमते.
1) मुख्य न्यायालयीन दंडाधिकाऱ्याचे न्यायालय 2) जिल्हा न्यायालय
3) दिवाणी न्यायालय 4) सत्र न्यायालय

49. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम, 1989 मध्ये ------- प्रकरणे व ------- कलमे समाविष्ट आहेत.
1) 6, 25 2) 4, 26 3) 6, 24 4) 5, 23

50. 'महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमे' ची सुरूवात ------ पासून झाली.
1) 30 सप्टेंबर 2006 2) 15 ऑगस्ट 2007 3) 2 ऑक्टोबर 2007 4) 30 सप्टेंबर 2007

51. शोषणाविरूध्दचा अधिकार भारतीय राज्यघटनेच्या -------- अनुच्छेदांमध्ये दिलेले आहेत.
1) 20 आणि 21 2) 23 आणि 24 3) 22 आणि 25 4) 25 आणि 26

52. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, 1989 च्या कलम 15 नुसार, राज्य शासन प्रत्येक विशेष न्यायालयात खटले चालविण्याकरिता, शासकीय राजपत्रातील अधिसुचनेद्वारे, विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून एखाद्या सरकारी अभियोक्तास विनिर्दिष्ट करील किंवा अधिवक्ता म्हणून -------- पेक्षा कमी नसतील इतकी वर्षे व्यवसाय करत असलेल्या अधिवक्त्याची नेमणूक करील.
1) सात वर्षे 2) पाच वर्षे 3) दहा वर्षे 4) आठ वर्षे

53. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, 1989 नुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या व्यक्तिवर आपले घर सोडण्यास सक्ती करणारा किंवा त्यास कारणीभूत ठरणाऱ्या व्यक्तिस दंडा बरोबर ------- महिन्यांपेक्षा कमी नसलेली जी ----- वर्षा पर्यंत वाढू शकते अशी तुरूंगवासाची शिक्षा होऊ शकते.
1) 1 महिना 1 वर्ष 2) 2 महिने 2 वर्ष 3) 6 महिने 5 वर्षे 4) 3 महिने 7 वर्षे

54. नागरी हक्क संरक्षण अधिनियम, 1955 कलम 16-अ अन्वये ज्या व्यक्तिला या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेला एखादा अपराध केल्याबद्दल दोषी ठरवण्यात आले असले अशा ------- वरील वयाच्या कोणत्याही व्यक्तिला 'अपराधी परिवीक्षा अधिनियम' 1958 (1958 चा 20) याच्या तरतूदी लागू होणार नाहीत.
1) 12 वर्षा 2) 14 वर्षा 3) 16 वर्षा 4) 10 वर्षा

55. मानवी हक्कांच्या जागतिक जाहीरनाम्यातील कलम ------- मध्ये सामाजिक सुरक्षिततेचे हक्क याबद्दल विशद केले आहे तेच भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद --------मध्ये समाविष्ट केले आहे. #
1) 8, 29 2) 22, 29 (1) 3) 18, 24 4) 17, 19(1)अ

56. अशी व्यक्ती जी शासकीय कर्मचारी आहे परंतु अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीची सदस्य नाही व ती अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा, 1989 खाली आपले कर्तव्य हेतूपरस्पर पार पाडण्यास टाळत असल्यास अशा व्यक्तिला -------- पेक्षा कमी नसलेली परंतु ------- पर्यंत वाढू शकते अशी तुरूंगवासाची शिक्षा होऊ शकते.
1) एक महिना, सहा महिने 2) सहा महिने, चार वर्ष 3) एक वर्ष दोन वर्ष 4) सहा महिने, एक वर्ष

57. हुंडाबंदी अधिनियमानुसार हुंडा देणे किंवा घेणे यास ------- अशी शिक्षा होते.
1) दोन वर्षापेक्षा कमी नाही 2) तीन वर्षापेक्षा कमी नाही 3) चार वर्षापेक्षा कमी नाही 4) पाच वर्षापेक्षा कमी नाही

58. नागरी हक्क संरक्षण अधिनियम, 1955 मधील कलम --------- नुसार माल विकण्याचे किंवा सेवा उपलब्ध करून देण्याचे नाकारल्याबद्दल शिक्षा लागू होते.
1) 4 2) 5 3) 6 4) 7

59. कौटुंबिक हिंसाचार पासून महिलेचे संरक्षण, नियम 2006 च्या नियम-8 नुसार संरक्षण अधिकाऱ्याचे कर्तव्य आहे की :
अ. पीडितेस तक्रार करण्यास सहाय्य करणे.
ब. तिला पीडित व्यक्तिच्या अधिकारांची माहिती देणे.
क. 'सुरक्षा नियोजन' तयार करणे व पुढील काळात कौटुंबिक हिंसा प्रतिबंधास उपाययोजन करणे.
वरीलपैकी कोणते विधान/ने बरोबर आहेत ?
1) फक्त अ बरोबर 2) फक्त अ व क बरोबर 3) फक्त ब व क बरोबर 4) सर्व बरोबर

60. 'अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती' या शब्द प्रयोगांना, संविधानाच्या अनुच्छेद 366 चे अनुक्रमे खंड ------- व -------- यांमध्ये त्यांना जे अर्थ नेमून दिलेले आहेत तेच अर्थ असतील
1) 21 ,22 2) 22, 23 3) 23, 24 4) 24, 25

YASH ACADEMY TM

## मुंबई पोलीस कायदा

61. महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 कलम 52 (1) नुसार, जिल्हा दंडाधिकाऱ्याने (महसूल आयुक्तांच्या पूर्व मान्यतेने) कलम 51, पोट कलमे (-------) ते (---------) या अन्वये भरपाई दाखल वसूल केलेली सर्व रक्कम किंवा कोणताही पैसा, उपरोक्त हानी किंवा नुकसान झाल्याबद्दल किंवा मृत्यूच्या किंवा जबर दुखापतीच्या संबंधाने ज्या व्यक्तींना भरपाई मिळण्याचा हक्क आहे, असे त्यास वाटत असेल अशा सर्व किंवा कोणत्याही व्यक्तींना देणे किंवा त्यांच्यात त्या रकमेची विभागणी करणे हे कायदेशीर असेल.
1) 3, 8 2) 1, 9 3) 2, 10 4) 1, 8

62. महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 मधील कलम 80(1) अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याने याबाबतीत विशेष रित्या कामावर नेमलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास, ------ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या एखाद्या अपराधाबद्दल अधिपत्राशिवाय अटक करता येईल.
1) कलम 98 2) कलम 110 3) कलम 82 4) कलम 86

63. महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 मधील कलम 12(2) नुसार, असा प्रत्येक विभाग ------- च्या प्रभाराखाली असेल व असा प्रत्येक उप-विभाग हा पोलीस निरिक्षकाच्या प्रभाराखाली असेल.
1) पोलीस उप-अधिक्षक 2) अपर आयुक्त 3) सहायक आयुक्त 4) सहायक पोलीस निरीक्षक

64. महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 च्या अंतर्गत नाशिक येथील पोलीस प्रशिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून राज्य सरकारला कोणाची नेमणूक करता येते ?
1) कोणताही पोलीस अधिकारी
2) ज्यांनी इतर कोणत्याही कॉलेजचे प्राचार्य म्हणून काम पाहिले आहे अशी व्यक्ती
3) पोलीस अधिक्षक दर्जाहून कमी दर्जाचा नसेल असा कोणताही पोलीस अधिकारी
4) पोलीस महानिरीक्षक

65. महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 च्या अंतर्गत उपहार गृह, परमीट रूम, बियर बार या ठिकाणी नृत्यविष्कारावर कोणत्या कलमान्वये बंदी घालण्यात आली आहे ?
1) कलम 33 2) कलम 32 3) कलम 30 4) कलम 33-अ

66. महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 कलम 34 अन्वये --------- व ------- यास आपआपल्या प्रभाराखाली असलेल्या क्षेत्रात, जेव्हा त्याच्या मते तशी कार्यवाही करणे आवश्यक असेल तेव्हा, त्यास योग्य वाटेल अशा पोलीस अधिकाऱ्यास कोणत्याही रस्त्यावर वाहने हाकण्याचे तात्पुरते बंद करण्याच्या प्रयोजनाकरिता अशा रस्त्यावर अडथळे उभारण्याचा अधिकार देता येईल.
1) जिल्हा दंडधिकारी, उपविभागीय अधिकारी 2) आयुक्त, जिल्हा पोलीस अधीक्षक
3) सहायक आयुक्त, उपायुक्त 4) पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक

67. महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 मधील कोणते कलम जनतेसंबंधी पोलीस अधिकाऱ्यांच्या कर्तव्यांशी संबंधित आहे ?
1) कलम 66 2) कलम 64 3) कलम 65 4) कलम 67

68. महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 च्या अंतर्गत दिलेल्या ''जागा'' या शब्दाच्या व्याख्येत खालीलपैकी कशाचा समावेश होत नाही ?
अ. तंबू ब. तात्पुरता मंडप (बुथ) क. तात्पुरते बांधकाम ड. खुले क्षेत्र (मोकळी जागा)
पर्यायी उत्तरे :
1) फक्त क 2) क आणि ड 3) अ आणि ब 4) वरीलपैकी सर्व

69. महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 कलम 2(11) अन्वये, 'पोलीस अधिकारी' या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमान्वये नेमलेली किंवा नेमण्यात आली आहे असे समजण्यात येणारी पोलीस दलातील कोणतीही व्यक्ती असा होतो आणि यात कलम -------- किंवा ------- अन्वये नेमलेला विशेष पोलीस अधिकारी किंवा अपर पोलीस अधिकारी याचा समावेश होतो.
1) 19, 20 2) 21,22 3) 23, 24 4) 25, 26

70. महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 च्या अंतर्गत पोलीस गणवेशाचा अनधिकृतपणे वापर केल्याबद्दल ------- पर्यंत द्रव्यदंडाची शिक्षा होईल.
1) 5000 2) 1000 3) 10, 000 4) वरीलपैकी नाही

## भारतीय दंड संहिता

71. भारतीय दंड संहिता 1860 कलम 22 प्रमाणे कुठली मालमत्ता 'चल' संपत्ती नाही ?
अ. वीजप्रवाह ब. जमिनीतुन काढलेले दगड व खनिज
क. पैसे आणि दागदागिने ड. शेत जमीन
पर्याय :
1) अ आणि ड 2) अ, ब आणि ड 3) अ आणि ब 4) फक्त ड

72. भारतीय दंड संहितेतील कोणत्या कलमान्वये गुन्हेगारी स्वरूपाच्या कटाची व्याख्या दिलेली आहे ?
1) कलम 120-ब 2) कलम 120-अ 3) कलम 120 4) कलम 119

73. भारतीय दंड संहिता 1860 कलम 141 प्रमाणे 'बेकायदेशीर जमाव' संबोधण्याकरीता जमावा मध्ये किती व्यक्ती असल्या पाहिजेत ?
1) दोन 2) सात किंवा जास्त 3) पाच किंवा जास्त 4) वरीलपैकी नाही

74. पैसे भरण्याच्या बंधपत्रावरून अ हा ब च्या विरूध्द दावा लावतो. ब बंधपत्र केल्याचे नाकारतो. बंधपत्र ज्या वेळी केले असल्याचे अभिकथन करण्यात आले त्या वेळी ब ला विशिष्ट प्रयोजनासाठी पैशाची जरूरी होती हे तथ्य ------- आहे.
भारतीय अधिनियमाच्या तरतुदीनुसार योग्य उत्तर निवडा.
1) नाशाबीत 2) बिनशाबीत 3) संबध्द 4) असंबध्द

75. भारतीय दंड संहिता 1860 नुसार, खालीलपैकी कोणते दंगलीचे घटक आहेत ?
अ. मारामारी
ब. दोन किंवा अधिक व्यक्तींची मारामारी
क. सार्वजनिक ठिकाणी मारामारी
ड. मारामारीमुळे सार्वजनिक शांततेचा भंग
पर्याय :
1) फक्त ब 2) ब आणि क 3) ब आणि ड 4) वरील सर्व

76. भारतीय दंड संहितेतील खालीलपैकी कोणत्या कलमाद्वारे 'व्यक्ती' या शब्दाची व्याख्या सांगितली आहे ?
1) 10 2) 8 3) 11 4) 12

77. 'अनैसर्गिक अपराध' याचा उल्लेख भारतीय दंड संहिता 1860 च्या ------- या कलमाखाली आहे.
1) 376- अ 2) 497 3) 377 4) वरीलपैकी नाही

78. भारतीय दंड संहितेतील कलम ------- अन्वये प्राणघातक शस्त्रनिशी सज्ज होऊन 'दंगा' करणे या गुन्हयाची व्याख्या दिली आहे.
1) 145 2) 149 3) 148 4) 146

79. भारतीय दंड संहिता 1860 मधील तरतुदी प्रमाणे ------- वयाखालील मुलाने कोणत्याही परिस्थितीत कोणतेही केलेले कृत्य गुन्हा होत नाही ?
1) पाच वर्षे 2) सात वर्षे 3) सोळा वर्षे 4) बारा वर्षे

80. भारतीय दंड संहितेतील कोणती कलमे मालमत्तेच्या विरूध्द अपरांधाविषयी आहेत ?
1) 378 ते 462 2) 463 ते 489 इ 3) 499 ते 510 4) 330 ते 377

81. 'ए' या पोलीस अधिकाऱ्यास 'वाय' ला अटक करण्याकरिता न्यायालयाने आदेश दिलेले आहे आणि चौकशी अंती गैरसमजुतीने 'झेड' ला 'वाय' समजून 'झेड' ला अटक केली आहे. 'ए' याने भारतीय दंड संहिता -------- खाली गुन्हा केलेला नाही.
1) कलम 76 2) कलम 78 3) कलम 77 4) कलम 79

82. फौजदारी दंड संहिता 1973, कलम 144 अंतर्गत काढलेला आदेश जास्तीत जास्त ------- महिन्यांपर्यंत अंमलात रहातो आणि जरूरी असल्यास राज्य सरकार जास्तीत जास्त -------- महिन्यांपर्यंत मुदत वाढवू शकते.
1) 12, 24 2) 2, 6 3) 1,3 4) 3,6

## फौजदारी प्रक्रिया संहिता - 1973

83. फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 कलम 70 च्या अंतर्गत काढलेले अटक वॉरंट किती काळापर्यंत अंमलात राहते ?
1) 1 वर्ष 2) 6 महिने 3) 5 वर्षे
4) ज्यांनी काढले त्या कोर्टाकडून रद्द होईपर्यंत किंवा त्याची अंमलबजावणी होईपर्यंत

84. फौजदारी प्रक्रिया संहितेतील कोणत्या कलमान्वये असे स्पष्ट केले आहे की एखाद्या व्यक्तीला एखादा अपराध केल्याच्या आरोपावरून अटक करण्यात आली असेल आणि अशा अपराधाच्या अन्वेषणाच्या प्रयोजनासाठी इतर कोणत्याही व्यक्तिने किंवा व्यक्तिंनी त्याची ओळख पटविणे आवश्यक असले तेव्हा, त्या अधिकारीता असणाऱ्या न्यायालयाला, पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांच्या विनंतीवरून अशा प्रकारे अटक करण्यात आलेल्या व्यक्तिला तिने न्यायालयाला योग्य वाटेल अशा रितीने कोणत्याही व्यक्तिकडून किंवा व्यक्तिकडून ओळख पटविण्यासाठी स्वतःला अधीन करण्याबाबत निदेश देता येतील.
1) कलम 54 2) कलम 54-अ 3) कलम 55- अ 4) कलम 55

85. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम 11(2) खाली जी न्याय दंडाधिकाऱ्यांची न्यायालये स्थापन केली जातात अशा न्यायालयांचे पीठासन अधिकारी-------- कडून नियुक्त केले जातात.
1) जिल्हा न्यायालय 2) राज्य सरकार 3) उच्च न्यायालय 4) सर्वोच्च न्यायालय

86. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम 94 (2)च्या अंतर्गत 'आक्षेपार्ह वस्तू' कोणत्या होतात ?
अ. नकली नाणे ब. बनावट दस्तऐवज क. खोटे शिक्के ड. बनावट नोटा
पर्याय :
1) अ आणि ड 2) ब आणि क 3) फक्त ब 4) अ, ब, क आणि ड

87. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम 96 अन्वये ज्याच्या बाबतीत कलम 95 खाली समपहरणाची घोषणा करण्यात आली असेल अशा कोणत्याही वर्तमानपत्रात, पुस्तकात अगर इतर दस्तऐवजात हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तिला, शासकीय राजपत्रात अशी घोषणा प्रकाशित झाल्याच्या दिनांकापासून ------- आत उच्च न्यायालयाकडे अशी घोषणा रद्द करावी यासाठी अर्ज करता येईल.
1) दोन महिन्यांच्या 2) एक वर्षाच्या 3) सहा महिन्यांच्या 4) तीन महिन्यांच्या

88. फौजदारी प्रक्रिया संहितेतील कलम 2(आर) नुसार ''पोलीस अहवाल'' म्हणजे पोलीस अधिकाऱ्याने --------- च्या पोटकलम 2 प्रमाणे न्यायाधीशांकडे पाठविलेला अहवाल होय.
1) कलम 176 2) कलम 173 3) कलम 174 4) कलम 175

89. फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 च्या तरतुदींनुसार दखलपात्र अपराध म्हणजे -------
1) पोलीस अधिकारी वॉरंट शिवाय अटक करू शकतात 2) पोलीस अधिकारी वॉरंट असेल तरच अटक करू शकतात.
3) अजामिनपात्र अपराध 4) वरीलपैकी नाही

90. '' फौजदारी प्रक्रिया संहितेच्या '' आधारे योग्य विधान निवडा.
अ. सहाय्यक सत्र न्यायाधिश, मृत्युदंड किंवा जन्मठेप या खेरीज कायद्याने ठरवून दिलेली कोणतीही शिक्षा देऊ शकतात.
ब. सत्र न्यायाधिशांनी दिलेल्या मृत्युदंडाच्या शिक्षेला उच्च न्यायालयाची परवानगी लागते.
पर्यायी उत्तरे :
1) विधान अ चूक असून ब बरोबर आहे. 2) विधान अ बरोबर असून ब चूक आहे.
3) अ आणि ब दोन्ही विधाने बरोबर आहेत. 4) अ आणि ब दोन्ही विधाने चूक आहेत.

91. फौजदारी प्रक्रिया संहितेतील कलम 438 (2) मध्ये दिलेल्या ------- अटी उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालय कलम 438 च्या पोटकलम (1) खाली निदेश देताना समाविष्ट करू शकेल.
1) तीन 2) पाच 3) चार 4) सहा

## भारतीय पुरावा कायदा (Indian Evidence Act.)

92. भारतीय साक्षी पुरावा अधिनियमाच्या कलम 90 नुसार खालीलपैकी कोणता योग्य ताबा आहे असे समजण्यात येईल ?
अ. 'अ'कडे दिर्घकाळ जमीनजुमल्याचा कब्जा आहे. जमिनीवरील त्याचे हक्क दर्शविणारे जमीनविषयक विलेख तो आपल्या ताब्यातून हजर करतो.
ब. 'अ' ज्या जमीनजुमल्याचा गहाणधारक आहे, त्या संबंधीचे विलेख तो हजर करतो. गहाणकाराकडे कब्जा आहे.
क. 'ब' चा नातेवाईक असलेल्या 'अ' ने 'ब' ने त्याच्या ताब्यात असलेले जमिनीसंबंधीचे विलेख त्याच्याकडे सुरक्षित ताबा राहण्यासाठी ठेवले होते ते हजर करतो.
पर्याय :
1) फक्त अ 2) फक्त अ आणि ब 3) फक्त क 4) वरील सर्व

93. भारतीय साक्षी पुरावा अधिनियमाच्या कोणत्या कलमानुसार न्यायिक दखल घेण्याजोगे तथ्य शाबीत करण्याची आवश्यकता नाही ?
1) 3 2) 3-अ 3) 56 4) 57

94. भारतीय साक्षी पुरावा अधिनियमातील कलम ------, --------, ------- आणि ------ एकत्रितरित्या 'कबुली' बाबतची व्याख्या स्पष्ट करतात.
1) 12, 13, 14, 15 2) 13, 14, 15, 16 3) 17, 18, 19, 20 4) 21, 22, 23, 24

95. भारतीय साक्षी पुरावा अधिनियम 1872 च्या अंतर्गत 'ओळख परेड' घेण्याचे अधिकार कोणाला आहेत ?
अ. कार्यकारी दंडाधिकारी ब. पोलीस इन्स्पेक्टर क. तुरूंगाधिकारी
योग्य पर्याय निवडा.
1) फक्त अ 2) फक्त क 3) ब किंवा क 4) वरीलपैकी नाही

96. भारतीय साक्षी पुरावा अधिनियमाच्या संदर्भात योग्य विधान कोणते आहे ?
अ. राज्य सरकारने पारीत केलेले आणि नोंदलेले कायदे हे सार्वजनिक दस्तऐवज आहेत.
ब. खाजगी व्यक्तिनी नोंदणी केलेले त्याचे मृत्युपत्र हा खाजगी दस्तऐवज आहे.
पर्यायी उत्तरे :
1) विधान अ चूक असून ब बरोबर आहे. 2) विधान अ बरोबर असून ब चूक आहे.
3) विधान अ आणि ब दोन्ही चूक आहेत. 4) विधाने अ आणि ब दोन्ही बरोबर आहेत.

TM YASH ACADEMY

97. भारतीय साक्षी पुरावा अधिनियमाच्या --------- अन्वये कोणत्याही फौजदारी खटल्यामध्ये आरोपी व्यक्ती चांगल्या चरित्र्याची आहे हे तथ्य संबध्द असते.
1) कलम 54 2) कलम 53 3) कलम 52 4) कलम 55

98. भारतीय साक्षी पुरावा कायद्या 1872 संदर्भात :
अ. ऐकीव पुरावा म्हणजे, एखादी गोष्ट मी स्वतः ऐकली आहे असे साक्षीदार सांगतो.
ब. दुय्यम पुरावा म्हणजे कोर्टापुढे तपासणीसाठी सादर केलेला मूळ लेख अथवा दस्तऐवज़
वरीलपैकी सत्य विधान/ने कोणते/ती ?
1) विधान अ सत्य असून ब असत्य आहे. 2) विधान अ असत्य असून ब सत्य आहे.
3) अ आणि ब दोन्ही विधाने सत्य आहेत. 4) अ आणि ब दोन्ही विधाने असत्य आहेत.

99. भारतीय साक्षी पुरावा अधिनियमातील कोणत्या कलमानुसार पोलीसांच्या हवालीत असताना कोणत्याही व्यक्तिने दिलेला कबुलीजबाब अशा व्यक्ती विरूध्द शाबीत करता येत नाही ?
1) कलम 26 2) कलम 27 3) कलम 28 4) कलम 29

100. भारतीय साक्षी पुरावा कायदा 1872 च्या तरतुदीनुसार खालीलपैकी कोणत्या गोष्टी तथ्य आहेत ?
अ. विशिष्ट ठिकाणी विशिष्ट वस्तू विशिष्ट क्रमात लावल्या आहेत
ब. एखाद्या माणसाने काही ऐकले किंवा पाहिले
क. एखाद्या माणसाने विशिष्ट शब्द म्हटले
पर्याय :
1) अ आणि ब फक्त  2) अ आणि क फक्त  3) अ फक्त  4) वरील सर्व

---

## ANS KEY - पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परिक्षा - 2018 सामान्य अध्ययन - पेपर २

| Que. | Ans | | Que. | Ans | | Que. | Ans | | Que. | Ans | | Que. | Ans |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 | | 21 | 4 | | 41 | 3 | | 61 | 1 | | 81 | 1 |
| 2. | 4 | | 22 | # | | 42 | 3 | | 62 | 2 | | 82 | 2 |
| 3. | 4 | | 23 | 1 | | 43 | 1 | | 63 | 3 | | 83 | 4 |
| 4. | 2 | | 24 | 2 | | 44 | 4 | | 64 | 3 | | 84 | 2 |
| 5. | 3 | | 25 | 2 | | 45 | 4 | | 65 | 4 | | 85 | 3 |
| 6 | 2 | | 26 | # | | 46 | 2 | | 66 | 2 | | 86 | 4 |
| 7 | 2 | | 27 | 4 | | 47 | 4 | | 67 | 1 | | 87 | 1 |
| 8 | 1 | | 28 | 1 | | 48 | 4 | | 68 | 4 | | 88 | 2 |
| 9 | # | | 29 | 3 | | 49 | 4 | | 69 | 2 | | 89 | 1 |
| 10 | 3 | | 30 | 1 | | 50 | 2 | | 70 | 4 | | 90 | 1 |
| 11 | 2 | | 31 | 2 | | 51 | 2 | | 71 | 1 | | 91 | 3 |
| 12 | 4 | | 32 | 2 | | 52 | 1 | | 72 | 2 | | 92 | 4 |
| 13 | 3 | | 33 | # | | 53 | 3 | | 73 | 3 | | 93 | 3 |
| 14 | 3 | | 34 | 1 | | 54 | 2 | | 74 | 3 | | 94 | 3 |
| 15 | 4 | | 35 | 4 | | 55 | # | | 75 | 4 | | 95 | 1 |
| 16 | 2 | | 36 | 4 | | 56 | 4 | | 76 | 3 | | 96 | 2 |
| 17 | 3 | | 37 | 2 | | 57 | 4 | | 77 | 3 | | 97 | 2 |
| 18 | 4 | | 38 | 2 | | 58 | 3 | | 78 | 3 | | 98 | 1 |
| 19 | 1 | | 39 | 4 | | 59 | 4 | | 79 | 2 | | 99 | 1 |
| 20 | 2 | | 40 | 3 | | 60 | 4 | | 80 | 1 | | 100 | 4 |